“सोलापूर जिल्ह्यातील माढा व सांगोला तहसीलमधील लोकसंख्या व ग्रामीण वस्तीचा भौगोलिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत, भूगोल विषयातील पीएच.डी.

(विद्या वाचस्पती) या पदवीकरिता

सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधिका

बंड अर्चना महादेव

(एम.ए.,बी.एड्.,एम. फिल.)

मो.नं. ९५२७६९३३७०

E-mail- anilmband11@gmail.com

Category :- Open

मार्गदर्शक

डॉ. एन.टी. देशमुख

(एम.ए.,बी.एड्.,सेट.,पीएच.डी.)

मो.नं. ९४२३७०५४४६

E-mail – tanmayni3@rediffmail.com

विषय - भूगोल

डिसेंबर - २०१७

पीएच.डी.

संशोधन आराखडा

"सोलापूर जिल्ह्यातील माढा व सांगोला तहसीलमधील लोकसंख्या व ग्रामीण वस्तीचा भौगोलिक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत, भूगोल विषयातील पीएच.डी.

(विद्या वाचस्पती) या पदवीकरीता

सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधिका

बंड अर्चना महादेव

(एम.ए.,बी.एड्.,एम. फिल.)

मार्गदर्शक

डॉ. एन.टी. देशमुख

(एम.ए.,बी.एड्.,सेट.,पीएच.डी.)

सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग,

महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर

ता. अहमदपूर जि. लातूर

: भूगोल संशोधन केंद्र :

महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

(महाराष्ट्र)

डिसेंबर २०१७

“सोलापूर जिल्ह्यातील माढा व सांगोला तहसीलमधील लोकसंख्या व ग्रामीण वस्तीचा भौगोलिक अभ्यास”

१.१ प्रस्तावना :-

‘भूगोल’ हा प्राचीन विषय आहे. अगदी प्रारंभिक अवस्थेत ‘भूगोल’ म्हणजे पृथ्वीचे वर्णन करणारे शास्त्र अशी व्याख्या केली गेली होती. मानवी भूगोल ही भूगोलाची प्रमुख शाखा आहे. मानवी भूगोलात मानवी क्रियाचा अभ्यास केला जातो. मानवी भूगोलाच्या लोकसंख्या भूगोल व वस्ती भूगोल या उपशाखा आहेत.

लोकसंख्या भूगोलामध्ये अध्ययनाचा केंद्रबिंदू मानव हाच आहे. लोकसंख्या भूगोलात मानवाची उत्पत्ती व विकास लोकसंख्या वाढ व वितरण लोकसंख्येची रचना, लोकसंख्या, स्थलांतर, आरोग्य, धर्म, वंश, वृध्दी, साक्षरता अशा विविध घटकाचा अंतर्भाव होतो. लोकसंख्येच्या वितरणावर विविध घटकांचा परिणाम होतो.

वस्ती भूगोल ही मानवी भूगोलाची महत्त्वपूर्ण शाखा आहे. वस्ती भूगोलामध्ये ग्रामीण व नागरी वसाहतींचा अभ्यास केला जातो. ग्रामीण वसाहती ह्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, कार्यात्मक आणि भूमी उपयोजनाच्या दृष्टिकोनातून शहरी वसाहतीपासून भिन्न स्वरूपाच्या असलेल्या दिसून येतात. ग्रामीण वस्तीमध्ये कृषी व कृषीशी संबंधीत कार्य करणारे लोक राहतात. इतिहासपूर्व काळापासून ग्रामीण वस्ती ह्या विखुरलेल्या स्वरूपात आहेत. वस्ती भूगोलामध्ये ग्रामीण व नागरी वसाहतीत म्हणजेच मानवाने वस्तीची बांधणी किंवा रचना कशी केली? कुठे केली? व तेथेच का केली? इत्यादी प्रश्नांची उत्तरे वस्ती भूगोलाकडून अपेक्षित असतात. या अभ्यासालाच वस्ती भूगोल म्हणून संबोधले जाते.

भारत हा विकसनशील देश असून या देशात ग्रामीण वस्तीचे प्रमाण जास्त आहे. सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ही ग्रामीण भागामध्ये वास्तव्य करीत आहे.

भारत हा खेड्यांचा देश आहे. प्राचीन काळापासून भारताचा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व कार्यात्मक विकास हा येथील ग्रामीण वस्त्यांमुळेच झालेला आहे. ग्रामीण वस्तीमध्ये अनेक सामाजिक समस्या उद्‌भवतात. मानव हा समाजशील प्राणी आहे. तो समूहाने जगणे पसंत करतो यातूनच सामाजिक बांधिलकी व सामाजिक गरजा निर्माण होतात. सामाजिक गरजेतून लोक एखाद्या ठिकाणी एकत्रित येवून विशिष्ट पध्दतीने घरे बांधतात आणि यातूनच वस्ती तयार होते. वस्ती ही कशीही असली तरी तिचा मुख्य उद्देश निवारा असतो. जगात अविकसित व विकसनशील देशामध्ये ग्रामीण वस्तीचे प्रमाण जास्त असल्यामुळे ग्रामीण वस्त्यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. ग्रामीण वस्त्या विखूरलेल्या स्वरुपात आढळतात. भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादी घटकामुळे ग्रामीण वस्तीचे प्रकार, प्रारुप रचना कशी आहे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

१.२ अभ्यास क्षेत्र :

प्रस्तुत संशोधनात्मक विषयासाठी सोलापूर जिल्ह्यातील माढा व सांगोला तहसीलची निवड करण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या पूर्वेकडील सोलापूर जिल्ह्यांचा अक्षवृत्तीय विस्तार १७° १०’ उत्तर ते १८° ३२’ उत्तर अक्षवृत्तीय विस्तार आहे. तर रेखावृत्तीय विस्तार ७४° ४२’ पूर्व रेखावृत्त ते ७६° १५’ पूर्व रेखावृत्तीय विस्तार आहे. सोलापूर जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १४.८९५ चौ. कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ४.८४ टक्के आहे. सोलापूर जिल्ह्याच्या उत्तरेस अहमदनगर व उस्मानाबाद, दक्षिणेस सांगली पश्चिमेला सातारा, पुणे हे जिल्हे आहेत. सोलापूर जिल्हयाच्या पूर्वेस आंध्रप्रदेश व दक्षिणेस कर्नाटक राज्याची सीमा आहे.

१.३. उद्दिष्टये :-

१) माढा व सांगोला तहसीलामधील ग्रामीण वस्तीच्या विकासावर प्राकृतिक घटकांचा होणाऱ्या परिणामांचे मूल्यमापन करणे.

२) ग्रामीण वस्ती आणि सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक घटकांमधील सहसंबंधात्मक विश्लेषणाचा अभ्यास करणे.

३) ग्रामीण वस्तीचे प्रकार अभिक्षेत्रीय आणि कालिक परिवर्तनाचे परीक्षण करणे.

४) माढा व सांगोला तहसीलमधील ग्रामीण वस्तीतील लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

५) माढा व सांगोला तहसीलमधील ग्रामीण वस्तीचा आकार व अंतर्गत रचना स्पष्टीकरणात्मक अभ्यास करणे.

६) माढा व सांगोला तहसीलमधील ग्रामीण सेवा केंद्राचे महत्त्व स्पष्ट करणे.

१.४ साहित्याचे पुनरावलोकन

एस.बी सावंत 'Studied Develeopment and Change : A Study of Village Khadaki Pune District' यांनी मागील ४० वर्षाच्या कालावधीतील पुणे जिल्ह्यातील खडकी गावच्या भौगोलिक परिस्थितीचे पुनरावलोकन करुन खडकी या गावातील आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास केला आहे.

एस.सी. सिंग आणि एस.बी. सिंग (१९८८) 'Studied Settlement Distribution of Their co-relation with morphometric attributes in Simla Hills' या संशोधनात्मक प्रबंधामध्ये तीव्र उतार आणि उंच भूपृष्ठरचना असणाऱ्या प्रदेशामधील वस्तीचा विकास हा कोणत्याही सपाट प्रदेशात विकसित होणाऱ्या वस्तीसारखा विस्तार अखंडपणे होत नाही. हे या संशोधनाचे प्रकटीकरण आहे. या संशोधनात्मक प्रबंधामध्ये अभ्यासाच्या विश्लेषणाचा मूलभूत पाया हा वस्तीही प्रक्रिया व अभिक्षेत्रीय प्रक्रिया या प्रदेशाच्या भूरुपीकी गुणांशी संबंधीत आहे.

ए.आर.कुंभार (1997) ‘Studied Rural Habitat as Regional Study of Rural settlement in Nira Valley’ या प्रबंधात निरनिराळ्या ग्रामीण वस्तीचा सदृश्य प्रदेशाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या प्रबंधात निरा नदीखोऱ्यातील ग्रामीण वस्तीवर तेथील भौगोलिक घटकांचा कशा प्रकारे परिणाम झालेला आहे याचा अभ्यास करण्यात आला आहे.

गौतम भट्टाचार्य (1995) ‘Studied Development Problem of Rural Settlement in the Coastal Area of the Bhat Region of Gujarat’ या संशोधनात्मक लेखाचा उद्देश ग्रामीण विकासासाठी पर्यावरणीय समस्या समजून घेणे, गुजरात राज्यातील माल प्रदेशाच्या किनारी भागाचे सूक्ष्म पातळीवर नियोजन करण्यासाठी भौगोलिक माहिती उपलब्द करून देणे हा होता.

हसन एम. आय (२००५) यांनी भारतातील लोकसंख्येचे विविध घटक व त्यावर परिणाम करणारे भौगोलिक घटक यावर सखोल संशोधन केले आहे.

१.५ अभ्यास पध्दती :-

प्रस्तुत संशोधनात्मक विषयाचा अभ्यास करण्यासाठी केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणे (मध्यमान, बहुलक, मध्यका) डेवोव्हरीजची विचलनाची (अपस्करणाची) सूची, जवळील शेजारी विश्लेषण (Nearest Neighbour Analysis) डिमॉजियाची विचलनाची सूची, लॉरेंज वक्र, सहसंबंध समाश्रयन अशा विविध पध्दतीचा व तंत्राचा अभ्यासात उपयोग करण्यात येणार आहे.

क्षेत्र अभ्यासाच्या सहाय्याने निवड करण्यात आलेल्या ग्रामीण वस्तीचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रश्नावलीच्या साहयाने ग्रामीण वस्तीतील विविध सेवाक्षेत्राचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनात्मक विषयाचा अभ्यास प्राथमिक व द्वितीय माहितीवर आधारित असणार आहे. ही आकडेवारी जिल्हा

सामाजिक आर्थिक समालोचन, महाराष्ट्र शासनाने शासकीय वार्तापत्र (गॅझेट), जिल्हा जनगणना, संदर्भ ग्रंथ यामधून मिळवण्यात येणार आहे. याचबरोबर विषयाशी संबंधीत अनेक पुस्तके, संशोधनात्मक लेख, पीएच.डी. प्रबंधामधून माहिती तंत्राचा उपयोग या अभ्यासात करण्यात येणार आहे.

ग्रामीण वस्तीच्या संशोधनात्मक अभ्यासासाठी संकलीत केलेल्या आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी खालील सांख्यिकी पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

१) ग्रामीण वस्तीतील अंतर काढण्यासाठी खालील सूत्राचा वापर केला आहे.

$$D = \sqrt{\frac{A}{N}}$$

D = सरासरी अंतर

A = एकूण क्षेत्रफळ

N = वस्तीची संख्या

२) ग्रामीण लोकसंख्येची सरासरी काढण्यासाठी खालील सांख्यिकी सूत्राचा वापर केला आहे.

$$S = \frac{P}{N}$$

S = ग्रामीण लोकसंख्येची सरासरी

P = ग्रामीण लोकसंख्या

N = ग्रामीण वस्तीची संख्या

१.६ प्रकरण रचना :-

१) प्रकरण पहिले :- संकल्पनात्मक मांडणी

या प्रकरणामध्ये विषयाची प्रस्तावना, वस्ती भूगोलाची ओळख, वस्ती लोकसंख्या भूगोलाची व्याख्या, लोकसंख्या भूगोलाची स्वरुप व व्याप्ती, वस्ती,

लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासाचे उद्देश, अभ्यास क्षेत्राची निवड, अभ्यासाची उद्दिष्टे, संशोधन पध्दती, साहित्याचे पुनरावलोकन, प्रकरण योजना इत्यादींचा अभ्यास केला आहे.

२) प्रकरण दुसरे :- माढा व सांगोला तालुक्याची प्राकृतिक व सांस्कृतिक रचना

या प्रकरणामध्ये तालुक्याची निर्मिती, तालुक्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, अभ्यासक्षेत्राचे स्थान व विस्तार, प्राकृतिक रचना, जलप्रणाली, हवामान, लोकसंख्या घनता, लिंग गुणोत्तर, साक्षरता प्रमाण, ग्रामीण वस्तीची घनता, भूमी उपयोजन यांचा विश्लेषणात्मक अभ्यास केला आहे.

३) प्रकरण तिसरे :- ग्रामीण वस्तीची उत्क्रांती

या प्रकरणामध्ये ग्रामीण वस्तीच्या उत्क्रांतीचा अभ्यास, प्राचीन काळातील ग्रामीण वस्त्या, मध्ययुगीन काळातील ग्रामीण वस्त्या, इत्यादीचे विश्लेषन केले आहे तसेच ग्रामीण वस्तीच्या नावाचे भौगोलिक विश्लेषन आणि वितरणाचा अभ्यास केला आहे.

४) प्रकरण चौथे :- ग्रामीण वस्तीचे वितरण वाढ आणि स्थान

या प्रकरणामध्ये भूरचनेला अनुसरुन ग्रामीण वस्तीचे वितरण, प्रवाह प्रणालीची घनता आणि ग्रामीण वस्तीचे वितरण, पर्जन्यानुसार ग्रामीण वस्तीचे वितरण, कृषीला अनुसरुन ग्रामीण वस्तीचे वितरण, जलसिंचनाला अनुसरुन ग्रामीण वस्तीचे वितरण, रस्त्याना अनुसरुन ग्रामीण वस्तीचे वितरण, ग्रामीण लोकसंख्येची वाढ, लोकसंख्येच्या गटानुसार ग्रामीण वस्तीचे वितरण आणि स्थान. इत्यादींचा अभ्यास केला आहे.

५) प्रकरण पाचवे :— ग्रामीण वस्त्यांचे प्रकार आणि प्रारुपे

या प्रकरणामध्ये ग्रामीण वस्तीचे प्रकार, ग्रामीण वस्तीची विविध प्रारुपे, ग्रामीण वस्तीच्या प्रारुपावर झालेल्या भौगोलिक आणि सांस्कृतिक घटकांचा परिणाम यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

६) प्रकरण सहावे :— ग्रामीण लोकसंख्या व वस्तीची अंतर्गत रचना

या प्रकरणामध्ये ग्रामीण लोकसंख्या आणि ग्रामीण वस्त्याच्या अंतर्गत रचनेचा अभ्यास ग्रामीण सर्वेक्षणाच्या आधारे करण्यात आलेला आहे.

७) प्रकरण सातवे : — ग्रामीण सेवा केंद्र

या प्रकरणामध्ये ग्रामीण सेवा केंद्राचे वर्गीकरण, ग्राम-नगर केंद्र, ग्रामीण सेवा सुविधांची क्षमता, यात प्राथमिक शिक्षणाची सुविधा, माध्यमिक शिक्षणाची सुविधा, आरोग्य केद्राची सुविधा, बॅकेची सुविधा, डाक कार्यालयाची सुविधा, आठवडी बाजार सुविधा याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

८) प्रकरण आठवे :— निष्कर्ष

या प्रकरणामध्ये माढा व सांगोला तालुक्यातील ग्रामीण लोकसंख्या व वस्ती यांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यावर आधारीत निष्कर्ष काढण्यात येतील.

आशा प्रकारे या संशोधन प्रबंधात माढा व सांगोला तालुक्यातील ग्रामीण लोकसंख्या व वस्तीचा तुलनात्मक अभ्यास सात प्रकरणाच्या माध्यमातून करण्यात येईल.

संदर्भ ग्रंथ

१) अहिरराव वा.र. (१९९७) : अधिवास भूविज्ञान, निराली प्रकाशन, पुणे

२) प्रा. के. ए. खतीब (१९९७): वसाहती भूगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

३) घारपूरे, व्हि. टी. (२००१) वस्ती भूगोल, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

४) तिवारी आर. सी. (२००१) अधिवास भूगोल, प्रयाग पुस्तक भवन इलाहाबाद.

५) भारतीय जनगणना अहवाल १९८१, १९९१ आणि २००१.

६) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सोलापुर जिल्हा.

७) भारतीय स्थलदर्शक नकाशा.

८) Ahmad E (1952) Rural settlement Types in uttar Pradesh. Annals of the Association of American Geographers, Vol. 42. pp 223-246

९) Ali, S. M. (1942) Population and settlement in Ghaghar Plain : Indian Geographical journal, Vol. 17 pp 157-182

१०) डॉ. मंडल आर.बी. (१९७९) Introduction to Rural Settlement Concept Publishing Company, New Delhi.

११) www.Googleearth.com

१२) www.solapur.nic.in

संशोधिका
बंड अर्चना महादेव
(एम.ए.,बी.एड्.,एम. फिल.)

मार्गदर्शक
डॉ. एन.टी. देशमुख
सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग,
महात्मा गांधी महाविद्यालय,
अहमदपूर जि. लातूर